# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१२/०९/२०१६

**१) मोटार सायकलला धडक तिघाचा मृत्यु व एक जखमी. :–**

दिनांक १०/०९/२०१६ रोजी २२.०० ते २२.३० वा. दर. यातील मृतक १) सचीन बालकदास रंगारी वय २३ वर्ष रा. संताजी वार्ड भंडारा २) अलीन लक्ष्मण मालोदे वय २७ वर्ष रा. भंडारा ३) जावेद कासीम अन्सारी वय २६ वर्ष रा. लालालजपतराय वार्ड भंडारा व जखमी सलमान कासीम अन्सारी वय २३ वर्ष रा. भंडारा हे चारसिट (चौबल सिट) बिना नंबरची मोटार सायकल होन्डा शाईनवर बसुण भंडारा कडुन नागपूर कडे एनएच ०६ रोड नी जात असतांनी कोणत्यातरी अज्ञात वाहणचालकाने आपल्या ताब्यातील वाहण हयगयीने व लापरवाहीने चालवुन मोसाला मागेहुन धडक मारुन मृतक १ ते ३ यांचे मरणास व जखमी सलमान अन्सारी यास गंभीर जखमी होण्यास तसेच मोटार सायकल चे नुकसान होण्यास कारणीभुत झाल्याने व अपघातीची माहिती न देता पळुण गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रेहपाडे पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी सहकलम १८४,१३४(ब),१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) डेकोरेशन सांउड सिस्टीम चा सामान चोरून नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी २०.०० ते ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी हे २५ ते ३०वर्षा पासुन डेकोरेशन चे काम करित असुण दिं. ०५/०९/२०१६ पासुन सुरु झालेल्या गणेश उत्सव करिता हनुमाण वार्ड वरठी येथील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ येथे त्यांनी डेकोरेशन लावले असुन फिर्यादीचा मुलगा दर्शन मोहतुरे हा दररोज प्रमाणे सकाळी ०६.०० वा दरम्याण सांउड सिस्टीम चालु करण्याकरिता गेला असता सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचे बाजुला असलेल्या खुल्या खोलीत ठेवलेले आहुजा कं. २ एम्पलीफायर कि.३०,०००/–रु. आहुजा कं. माईक मिक्सर मशिन किं. १५,०००/–रू. असा एकुण ४५,०००/–रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी अरुण बाबुराव मोहतुरे वय ३९ वर्ष रा. शास्त्री वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) टिव्ही व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०९/०९/२०१६ ते ११/०९/२०१६ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादीचे घरी बहिण सौ. शारदा गुरुदेव सार्वे रा.भंडारा ही पाहुणी म्हणुन आली असता बहीनीचे घरी कुणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुण समोरील दाराचा ताला तोडुण आत प्रवेश करुण ओनीडा कं. एलएडी टिव्ही किं. १०,०००/–रू. व नगदी १,०००/–रू. असा एकुण ११,०००/–रू. चा माल चोरुण नेल्याने फिर्यादी सतिश रेवाजी पडोळे वय ३० वर्ष रा. एकलारी पो.स्टे. वरठी याचें तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. शेंडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी १९.३० वा दरम्यान यातिल फिर्यादी हा घरी जेवन करित असता यातिल आरोपी मुलाने फिर्यादीस 'तु हरामाचा खातोस कमवत नाही' असे म्हणुन भांडण करुण प्लॉस्टीक खुर्चीने डोक्यावर मारुन जखमी करुण व शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सुखदेव कारुजी गभणे वय ६८ वर्ष रा. मानेगाव बाजार याचें तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बहादुरे पो. स्टे.

**५) ट्रेलरचे चालकाने ट्रकला व ईनोव्हा गाडीला धडक दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी ००.३० वा दरम्यान यातिल फिर्यादी हा धारगाव एनएच ०६ रोडवर त्याचा नादुरुस्त ट्रक क्रं. सीजी ०७ सीए ८४७७ हा दुरुस्तर करित असतांना यातिल आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रेलर हयगयीने व लाफरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन मागेहुण फिर्यादीचे ट्रकला व ईनोव्हा गाडी क्रं. सीजी ०८ सीए ०१७७ ला धडक देवुन अंदाजे १,००,०००/–रू. चे नुकसान करुण अपघाताची सुचना न देता पळुण गेल्याने फिर्यादी जसबिरसिंग गुरुचरणसिंग टाग वय ४२ वर्ष रा. भिलाई (छ.ग) याचें तोंडी रिपोर्ट व ओ.पी. धारगाव ऑकरन्स वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७(ब) मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे.कारधा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, वरठी, साकोली, व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३६ लिटर हातभट्टी दारू कि. १,८५०/–रू. व २ लिटर ८९० मिली देशी दारू कि. ८५०/–रू. असा एकुण २,७००/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस, अवैध प्रवासी ०३ केसेस तसेच ईतर वाहनांवरती १०५ केसेस करण्यात आलेल्या आहेत

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.